# नेता आणि कार्यकर्ता

**संपादकीय**

जयश्री खाडिलकर-पांडेकृत

नेत्याच्या आणि पक्षाच्या
धोरणांसाठी स्वत:च्या
घरावर तुळशीपत्र ठेवणारा
कार्यकर्ता पाहिला होता

डोकं फुटेल, हात तुटेल
जेवणाचं ताट कसं भरेल
कधी पर्वा केली नाही
आईवडिलांचे ऐकलं नाही
देशाचं भलं करण्यासाठी
सर्वस्व पणाला लावणारा
कार्यकर्ता पाहिला होता

पण काळ बदलला, विचार बदलले
धोरणं, तत्त्व, पक्षनिष्ठा
पैशाच्या थैलीत, हरवले
आता कार्यकर्ता हुकमी मतांची
भलीमोठी यादी घेऊन येतो

बोला, किती द्याल?
अगदी सहजपणे विचारतो
इथे नाही तर तिकडे
दार उघडं आहे हेही सांगतो

वडापाव काय देता राव
बिर्याणीवरच मारीन ताव
चालत प्रचार करू म्हणता?
कोणत्या जगात राहता

दुचाकीही चालणार नाही, द्या मला कार
कार्यकर्ता नेत्यालाच
वेडं ठरवितो
निवडणुकीचे सर्व हिशेब
मोबाइलवर मांडतो

गल्लीबोळातील मंडळंही मागे नाहीत
प्रत्येकाला हवा त्याचा हिस्सा
महिलाही आता मागू लागल्यात वाटा
नजरेला नजर भिडवून बिनधास्त म्हणतात,
आमचे पती आणि मुलं काहीही म्हणेनात
आमचं वेगळं स्थान आहे
आमचाही मान आहे

आमचं काय ते आम्हाला द्या

पैसा आणि दारूची गटारं
वाहू लागली
नेता आणि कार्यकर्ता
दोघांचीही बोली लागली
नेता म्हणतो, तू कसला कार्यकर्ता
पाचशेच्या नोटेने मी तुला विकत घेतला

कार्यकर्ताही मग ओरडतो
तू तरी नेता कसला
पाच वर्षे गायब होतास
ओरबाडून अब्जाधीश बनलास
आता तुझं ऐकणार नाही
वसुली झाल्याशिवाय मत देणार नाही

कुणी गढूळ केले हे वातावरण
सांगता येणार नाही

कार्यकर्ता चूक की नेता
उत्तर मिळत नाही

एक मात्र खरं आहे
हे सर्व बदललं पाहिजे
पुन्हा खरी लोकशाही आली पाहिजे
कारण गढूळ झाली लोकशाही
तरी या लोकशाहीमुळेच कुणालाही
निवडणूक तरी लढवता येते

चहावाला पंतप्रधान होतो
वकील मुख्यमंत्री
म्हणून दूषित झाली लोकशाही तरी
या देशात लोकशाही हवी
कारण रिकाम्या पोटी, रिकाम्या हाती
लोकशाहीत निदान नडता येते
आपले नशीब आजमावण्याचं
स्वप्नं तरी पाहता येते